**वादीतर्फे साक्षीदार क्र.०२ चा सरतपास**
देवाची शपथ खरे सांगतो

नाव -राहूल गुणाजी मानकर

**<u>सरतपास वादी तर्फे श्री सी.जी.अखंडे यांच्या मार्फत शपथेवर सुरू.</u>**

**०९.** माझे शपथपत्र नि.क्र.३७ मधील मजकूर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे.

मी अभिलेखावर दस्तऐवज दाखल केलेला नाही.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**<u>प्रतिवादीतर्फे उलटतपास श्री.एस.एम.पिंपळकर यांच्यामार्फत शपथेवर सुरू.</u>**

**१०.** माझे शिक्षण ७वी पर्यंत झालेले आहे. मी दि.२०/०३/२०२५ पुर्वी मी अखंडे वकीलांच्या घरी गेलो नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी दि.२०/०३/२०२५ रोजी न्यायालयात शपथपत्र दाखल केले होते व मला शपथपत्र तयार करण्याकामी माझे वकीलांनी न्यायालयात बोलविले होते. माझ्या वकीलसाहेबांनी शपथपत्र तयार करून ठेवले होते. मी शपथपत्रावर सही केलेली आहे. मला वादमिळकतीचे सर्व्हे नंबर सांगता येतात. वादमिळकत ही वादी यांचे आजोबा राजाराम यांच्या मालकीची होती. हे म्हणणे खरे आहे की, राजाराम यांनी त्यांच्या हयातीत मृत्यूपत्र करून दिले व तिन भावांना जमिनीचे विभाजन करून दिले. हे म्हणणे खरे आहे की, वादमिळकत शेती ही वादी उत्तम यांचे आजोबा राजाराम यांच्या एकमेव मालकीची होती. हे म्हणणे खरे आहे की, ज्याप्रमाणे आजोबांनी मृत्यूपत्रामध्ये वाटण्या करून दिल्या त्याप्रमाणे नातु त्यांची शेती वाहत आहे. वादमिळकतीमध्ये विहीर खोदल्याबाबत माझ्या शपथपत्रामध्ये उल्लेख आहे परंतु, सदर विहीर ही काणत्या योजणेमधून खोदली याबाबत मला माहिती नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, वडीलांच्या काळात खोदलेली आहे. सदर विहीर कोणत्या वर्षात खोदली हे मला आठवत नाही. सदर विहीर सर्व्हे नंबर ४७ मध्ये आहे की ४८ मध्ये हे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, उन्हाळ्यामध्ये सदर विहीरीमध्ये पाणी राहत नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, पाणी राहते. हे म्हणणे खरे नाही की, सदर विहीरीवर उन्हाळ्यामध्ये मोटार चालत नाही.

**११.** हे म्हणणे खरे नाही की, उन्हाळ्याच्या काळामध्ये सहा महिने विहीरिला पाणी राहत नसल्यामुळे सदर विहीरिचा वापरच होत नाही. आता मला माझे शपथपत्र नि.क्र.३७ मधील परिच्छद क्र.४ मधील मजकूर 'परंतु वाटणी होउनही वाटनीत दिलेल्या शेतजमिनीची रितसर भुमापण कार्यालयामार्फत मोजणी न करताच अंदाजे दोर टाकून, गोटे गाडुन वाटणी व कब्जाद दिले होते' ही बाब कोणत्या तारखेला झाली ती तारिख मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, उत्तम याने वादमिळकतीची जी मोजणी केली ती सन २०१४ मध्ये केली होती.

**प्रश्न-**सदर वादमिळकतीमध्ये असलेली विहीर ही रघुनाथ याच्या हिस्यावर आलेल्या वाटणीमध्ये होती असे दिसुन आले बरोबर आहे काय?

**उत्तर-**दोघांच्या धु-याजवळ आहे.

मी मोजणीच्या वेळी मोक्यावर हजर नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, माझे शपथपत्र नि.क्र.३७ मधील परिच्छेद क्र.०७ मधील मजकूर खरा व बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, मोजणीप्रमाणे विहीर ही गट न. ४७ मध्ये आढळली. हे मला माहित नाही की, गट नंबर ४७ हा रघुनाथ यांचा आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, गट नंबर ४७ हा उत्तम यांचा नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर मोजणीबाबत उत्तम याला सन २०१४ मध्येच समजले होते. सन २०१४ ते २०२१ पर्यंत रघुनाथ याने मोजणीबाबत कारवाई केली होती परंतु काय कारवाई केली होती याबाबत मला माहिती नाही. उत्तम याचा अर्धा हिस्सा सदर विहीरिमध्ये असल्याबाबत मी दस्तऐवज पाहिलेला नाही.

**१२.** हे म्हणणे खरे नाही की, उत्तम याचा सदर विहीरिवर पाणी भरण्याचा कुठलाही अधिकार नाही. रघुनाथ याच्याकडे ट्रॅक्टर होते. हे मला माहित नाही की, त्याच्या ट्रॅक्टरवर योगेश परतेकी नावाचा ड्रायव्हर होता किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, मी सन २०१४ मध्ये त्यांचा ट्रक्टर भाड्याने घेलता होता.

**प्रश्न-**तुम्ही रघुनाथ याचा ट्रॅक्टर वापरल्याबात चार हजार रूपये भाडे देणे लागत होते काय?

**उत्तर-** मी पैसे दिलेले आहे.

हे म्हणणे खरे नाही की, सदर भाडे देण्यावरून माझ्यात व रघुनाथमध्ये वाद झाला होता व तेव्हापासुन रघुनाथसोबत माझे बोलणेचालणे बंद आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी उत्तमच्या सांगण्यावरून न्यायालयात आलो आहे. मला न्यायालयात येण्याकामी समन्स मिळालेला

नाही. हे म्हणणे खरे आहे की, उत्तम याने सांगितले साक्षीला या मी आलो.  हे म्हणणे खरे नाही की, मी उत्तम यांच्या सांगण्यावरून खोटी साक्ष देत आहे.  हे म्हणणे खरे नाही की, माझे गट नंबर ५८ मध्ये जमिन आहे हे मी खोटे सांगत आहे.  हे म्हणणे खरे नाही की, गट न.५८ ला लागुन वादातीत शेती आहे हे मी खोटे सांगत आहे.  हे म्हणणे खरे नाही की,मी खोटे शपथपत्र उत्तम यांच्या सागण्यावरून दाखल केले आहे व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा.

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,उमरेड
दि.२६/०६/२०२५

समक्ष

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,उमरेड